नि.दि.दावा क्र.५३/२०१६
अवतारसिंग वि. रवि

**आदेश नि.४८ व ५० वर**

१. निशाणी ४८ वरील अर्ज साक्षीदारांस पकंड वारंट काढण्यासाठी आहे व नि.५० वरील अर्ज सदर साक्षीदाराची साक्ष बाकी ठेवुन वादीचा पुरावा बंद करण्याची परवानगी मिळण्यासाठी आहे.

२. अर्ज व उत्तर वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. साक्षीदार रा.ना.जाधव यांना जमानती वारंटची बजावणी झालेली आहे. परंतु ते साक्षीला गैरहजर आहे. त्यामुळे त्यांच्यावर अटक वांरट काढणे योग्य आहे.

४. सदर साक्षीदार विरूध्द अटक वारंट काढण्याचा आदेश दिला असल्यामुळे त्याची साक्ष बाकी ठेवण्याचा प्रश्न उरत नाही. अशाप्रकारे एखादया साक्षीदाराची साक्ष बाकी ठेवुन पुरावा बंद करण्याची तरतुद दि.प्र.सहितेमध्ये नाही. वादी किंवा प्रतिवादी साक्षीदाराच्या हजेरीकरिता योग्य ती कार्यवाही करू शकतात किंवा अन्य पुराव्याव्दारे आवश्यक पुरावा अभिलेखावर आणु शकतात. म्हणुन नि. ५० नामंजुर होण्यास पात्र आहे.

**आदेश**

१. साक्षीदार रा.ना.जाधव यांच्यावर वादीकडून आवश्यक ती प्रोसस फी व बेलीफ भत्ता घेवुन अटक वारंट परतावा दि.१६/१०/२०२१ काढण्यात यावा.

स्वा
दि.२२/९/२०२१ ( पी.पी.देशपांडे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,वाशिम